# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.11.2025** **वारः गुरुवार**

---

१. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सुरक्षित वापरासाठी मार्गदर्शक सूचना प्रकाशित

२. राज्यातील दुर्गम आणि अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रह-आधारित इंटरनेट सेवा पोहोचविण्यासाठी देशात प्रथमच औपचारिक भागिदारी

३. एकल महिलांसाठी पुणे जिल्हा परिषदेद्वारे -माझे अस्तित्व- प्रकल्प आणि

४. ज्येष्ठ अभिनेत्री नीना कुळकर्णी यांना विष्णुदास भावे गौरवपदक प्रदान

<u>कृबु-मार्गदर्शक</u>

<u>इंट्रो</u>

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कामकाजासंबंधी मार्गदर्शक सूचना काल नवी दिल्लीत प्रकाशित केल्या. प्रधान वैज्ञानिक सल्लागार प्राध्यापक अजयकुमार सूद आणि मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन याप्रसंगी उपस्थित होते. याविषयीचा एक वृत्तांत...माझ्या सहकारी मंजुषा गायधनी यांच्याकडून....

<u>स्क्रीप्ट</u>

*विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरक्षित, समावेशक आणि जबाबदार पद्धतीनं होण्याची खात्री करण्यासाठी या मार्गदर्शक सूचनांद्वारे एक सर्वंकष चौकट सरकारनं आखून दिली आहे. या चौकटीमधील मुख्य तत्वातील भावना अतिशय साधी आहे, ती म्हणजे – कोणतीही हानी करु नका. कारण कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मानवतेच्या कल्याणासाठी रुजण्याआधी आणि रुजण्याऐवजी हानिकारक पद्धतीनंच होताना दिसत आहे. व्यक्ति आणि समाज यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापरातून होणारी जोखीम दूर करण्यासाठी अति-आधुनिक नवे शोध लावणं आणि या क्षमतेचा वापर सुरक्षितपणे विकसित आणि लागू करण्यासाठी एक शक्तिशाली कामकाजाची चौकट या सूचनांमध्ये प्रस्तावित आहे. भारताचं एआय मिशन या परिसंस्थेला सबळ करेल आणि अनेक देशांना प्रेरित करेल अशी अपेक्षा आहे.*

**<u>वांद्रे</u>**

उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाचा पायाभरणी आणि कोनशिला अनावरण कार्यक्रम सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते वांद्रे पूर्व इथल्या शासकीय वसाहत परिसरात काल पार पडला.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, न्यायमूर्ती  चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि अजित पवार, तसंच न्यायव्यवस्था, प्रशासन आणि पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

न्यायालयीन इमारती प्रत्येक नागरिकाला न्यायप्रवेश सुलभ करणाऱ्या ठराव्यात, अशी अपेक्षा न्यायमूर्ती गवई यांनी यावेळी व्यक्त केली.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून ही इमारत पूर्णपणे 'एआय-सक्षम' असेल आणि देशातील इतर न्यायालयांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केला.

**<u>विधी</u>**

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते गोरेगाव (पश्चिम), इथं महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ प्रकल्पाचा शुभारंभही काल करण्यात आला. याप्रसंगी न्यायमूर्ती गवई यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. महाराष्ट्रात राष्ट्रीय विधि विद्यापीठ प्रकल्प उभारणी हा ऐतिहासिक टप्पा आहे. महाराष्ट्रात न्यायपालिकेच्या पायाभूत सुविधांचा दर्जा देशात सर्वोत्तमपैकी एक आहे, असे गौरवोद्गार सरन्यायाधीशांनी याप्रसंगी काढले.

महाराष्ट्र हे तीन राष्ट्रीय विधि विद्यापीठ असलेलं देशातील एकमेव राज्य आहे. हा प्रकल्प केवळ महाराष्ट्राचाच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील विधि शिक्षणाचं केंद्र बनेल. नवी मुंबईत उभारण्यात येणाऱ्या 'एज्यु-सिटी'मध्ये जगातील सर्वोच्च विद्यापीठं येणार असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**<u>इंटरनेट</u>**

राज्यातील दुर्गम आणि अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रह-आधारित इंटरनेट सेवा पोहोचविण्यासाठी काल मुंबईत राज्य शासनाद्वारे स्टारलिंक कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला. अशी औपचारिक भागीदारी करणारं महाराष्ट्र देशातील पहिलं राज्य ठरलं आहे. कितीही दुर्गम भागातील असली तरी प्रत्येक शाळा, आरोग्य केंद्र आणि गावं आता डिजिटल संपर्कात येणार आहे, आपत्ती नियंत्रण कक्ष, वन चौक्या, किनारी क्षेत्र यांना ही उपग्रह-आधारित इंटरनेट सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रसंगी सांगितलं.

**इंट्रो-**

पुणे जिल्ह्यातील एकल महिलांना विद्यमान शासकीय योजनांमधून अधिकाधिक मदत मिळावी या उद्देशानं जिल्हा परिषदेद्वारे, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या संकल्पनेतून ‘माझे अस्तित्व’ हा विशेष प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत…

**स्क्रीप्ट**

*या उपक्रमांतर्गत एकल महिलांना सातबाऱ्यावर नाव नोंदविणं, घरपट्टी आणि घरकुलाच्या कागदपत्रांवर नाव नोंदविणं, शिधा पत्रिका, आधार, आयुष्यमान भारत कार्ड आदी आवश्यक कागदपत्रं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. त्यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी विशेष शिबिराचं आयोजनही करण्यात आलं आहे. जिल्हा परिषदेनं केलेल्या सर्वेक्षणामध्ये २८ हजार ७६१ एकल महिलांना आरोग्य तपासणी आणि मोफत उपचाराची गरज असल्याचं आढळून आलं आहे. २२ हजार महिलांना हक्काची निवाऱ्याची आवश्यकता आहे. तर कृषी आधारित आणि कृषीपूरक व्यवसाय सुरु करण्यासाठी ११ हजार ९०४ महिलांना मदतीची आवश्यकता असून ५ हजार ९२७ महिलांना मुलांच्या शिक्षणासाठी मदतीची गरज आहे. या सर्व कामी माझे अस्तित्व हा विशेष प्रकल्प उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, भूषण राजगुरु यांच्यासह संध्या खान पुणे.*

**केंद्रीय-पथक**

राज्यात अतिवृष्टीमुळं शेती, घरे, रस्ते, पूल, वीज आणि पाणीपुरवठा तसंच सार्वजनिक मालमत्तेचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर उच्चस्तरीय केंद्रीय पथकानं काल अहिल्यानगर, सोलापुर, बीड आणि धाराशिव या जिल्ह्यातील भागांना भेट देऊन पाहणी केली.

अहिल्यानंगर जिल्ह्याच्या पाथर्डी तालुक्यातील विविध गावांना भेट देणाऱ्या पथकाचं नेतृत्व सहसचिव आर. के. पांडे यांनी केलं. त्यांच्यासोबत कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे संचालक डॉक्टर अरविंद वाघमारे, तसंच गृह मंत्रालयाचे आशिष गौर, उपस्थित होते. पावसाचं पाणी घरात शिरल्यानं नुकसान झालेल्या ग्रामस्थ राजेंद्र पारेकर यांच्याशी पथकानं संवाद साधून परिस्थितीची माहिती घेतली.

धाराशिव जिल्ह्यात केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाचे उपसंचालक करण सरीन यांच्या नेतृत्वात एका पथकानं पाहणी केली. या पथकात वित्त मंत्रालयाचे उपसचिव कंदर्प पटेल, ग्रामीण विकास मंत्रालयाचे उपसचिव अभिषेक कुमार राज आणि जलशक्ती मंत्रालयाचे संचालक सतेंद्र प्रताप सिंग यांचा समावेश होता. या पथकानं परांडा तालुक्यातील खासगाव आणि वागेगव्हाण या गावांना भेटी दिल्या. खासगाव इथं पुरामुळे नुकसान झालेले शेतकरी दत्तात्रय सातपुते आणि प्रदीप शहा यांच्या शेतीची त्यांनी पाहणी केली.

बीड जिल्ह्याच्या अकरा तालुक्यांमधील अतिवृष्टी आणि पूरग्रस्त भागाची पाहणी केंद्रीय पथकानं कालपासून सुरु केली आहे.

सोलापुर जिल्ह्यातही अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळं विविध भागात झालेल्या शेती, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथकानं काल जिल्ह्यात दौरा केला.

<u>भरपाई</u>

गडचिरोली जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसान भरपाईचे १० कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाले आहेत. भरपाईची रक्कम जमा झाली नसेल, अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसील कार्यालय किंवा तलाठी कार्यालयाशी संपर्क साधावा असं आवाहन जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांनी केलं आहे.

धाराशिव जिल्ह्याला आत्तापर्यंत मदतीपोटी १ हजार ९८ कोटींचं अनुदान मिळालं असून आणखी मदत मिळण्यासाठी पाठपुरावा सुरु असल्याचं आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितलं.

<u>नीना</u>

सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीच्या वतीनं

रंगभूमीदिनाचं औचित्य साधून आद्यनाटककार विष्णुदास भावे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ नाट्यक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ज्येष्ठ अभिनेत्री नीना कुळकर्णी यांना ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या हस्ते विष्णुदास भावे गौरवपदक देऊन

सन्मानित करण्यात आलं. नीना कुळकर्णी यांनी मराठी चित्रपट, दूरदर्शन, नाट्य अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलं आहे. रंगभूमी दिनानिमित्त काल विविध सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले.

पुरस्कारानंतर आपलं मनोगत व्यक्त करताना नीना कुळकर्णी म्हणाल्या.....

<u>वंदेमातरम्</u>

वंदे मातरम् या गीताचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव म्हणजेच सार्धशतीनिमित्तानं देशात वर्षभर साजऱ्या होणाऱ्या स्मृतीदिनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या दिल्लीमध्ये होणार आहे. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं याचं आयोजन करण्यात येणार असून, स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आणि राष्ट्रीय अभिमान, एकता जागृत करणाऱ्या या कालातीत गीताची दीडशेवी वर्षपूर्ती साजरी होणार आहे. या निमित्तानं स्मरण तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन होणार आहे.

<u>सुनीताबाई</u>

आत्मकथनापासून पत्रलेखनापर्यंत विविध साहित्यप्रकारांमध्ये आपला ठसा उमटवलेल्या प्रतिभावंत साहित्यिक आणि बहुपैलू व्यक्तिमत्त्व लाभलेल्या सुनीताबाई देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त रत्नागिरीत उद्यापासून तीन दिवस विशेष कार्यक्रम होणार आहेत. राज्य मराठी विकास संस्थेच्या अर्थसाह्यातून आर्ट सर्कल या संस्थेनं हे कार्यक्रम आयोजित केले आहेत. पु. ल. देशपांडे यांच्या कथेवर आधारित असलेलं 'मॅड सखाराम' हे नाटक, जी. ए. कुलकर्णी आणि सुनीताबाई यांच्या पत्रांवर आधारित 'रुंग्ली रुंग्लीयॉट' हा कार्यक्रम तसंच सुनीताबाईंच्या साहित्यावर आणि एकंदर व्यक्तिमत्त्वावर आधारित विविध कार्यक्रम, कवितावाचन, अभिवाचनाच्या स्पर्धाही यामध्ये होणार आहेत.

<u>हवामान</u>

राज्यात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. विदर्भात हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.